'साप्ताहिक शब्दरुतू'चे वार्षिक वर्गणीदार होण्यसाठी क्यूआर कोडवर वार्षिक किंवा मासिक योजनांचे पेमेंट करून मो. ९०११२०१४१४ या व्हाट्सअॅप नंबरवर स्क्रिनशॉट व आपला पूर्ण पत्ता पाठवावा.
**वार्षिक वर्गणी : १८० । मासिक वर्गणी : १४**

# शब्दरुतू

पोस्टल परवाना नं. SRP/136/2023-2026
कार्यकारी संपादक : सुमीत लांडे, मुंबई
संपर्क : मो. ९०११२०१४१४
Email ID : shabdarutu@gmail.com

* वर्ष २ रे * अंक ३५ वा * रविवार दि. १ जून २०२५ (Decl.Regd.No. SR/MAG/11/2021) RNI.NO.MAHMAR/2021/84232 पाने ४ * किंमत ४ रु. साप्ताहिक (Weekly)

## हिंदी मुंबईची बोलीभाषा : सरनाईक

**मुंबई :** हिंदी आता मुंबईची बोलीभाषा झाली आहे. हिंदी ही आमची लाडकी बहीण असल्याचं वक्तव्य राज्य परिवहनमंत्री प्रताप सरनाईकांनी केलंय. राज्यात काही दिवसांपूर्वी मराठी भाषेच्या वापराबाबत राजकीय वातावरण तापलेलं होतं. राज्याचे परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी हिंदी ही आता मुंबईची बोलीभाषा बनली आहे. हिंदी ही आमची लाडकी बहीण आहे, असं वक्तव्य केलं आहे. मराठी आमची मातृभाषा आहे, आमची माय आहे असं म्हणतो. पण हिंदी आपली लाडकी बहीण आहे.

# आदिवासी आश्रमशाळांच्या खासगीकरणाचा घाट!

## आरोग्य परिचारिकानंतर बाह्यसंस्थेकडून कंत्राटी शिक्षकांची होणार नियुक्ती : आदिवासी संघटनांमध्ये संतापाचा उद्रेक

**चंद्रपूर :** आदिवासी विभागाचा निधी लाडकी बहीण योजनेसाठी वळता केल्याचा आरोप विरोधकांकडून होत असून सत्ताधाऱ्यांना टार्गेट केले जात आहे. आदिवासी समाजाप्रती सरकार संवेदनशील नसल्याचा आरोपही होत आहे. अशातच राज्यातील आश्रमशाळांमध्ये आरोग्य परिचारिकानंतर शिक्षकांची बाह्यसंस्थेकडून कंत्राटी तत्त्वावर नियुक्ती केली जाण्याच्या हालचालींना वेग आला आहे. त्यामुळे राज्य सरकारचा आदिवासी आश्रमशाळांचे खासगीकरण करण्याचा डाव असल्याची शंका आदिवासी संघटनांकडून व्यक्त केली जात आहे. दरम्यान, शासनाच्या आदिवासी आश्रमशाळांत बाह्यसंस्थेमार्फत कंत्राटी शिक्षक व कर्मचारी नियुक्त करण्याच्या निर्णयाला आदिवासी संघटनांकडून कडाडून विरोध होत आहे.


राज्यात डोंगराळ व दुर्गम भागात राहणाऱ्या आदिवासी समाजातील विद्यार्थ्यर्थ्यांना शैक्षणिक प्रवाहात आणण्यासाठी डोंगराळ भागात ५ हजार ते ७ हजार आदिवासी लोकवस्तीसाठी एक आश्रमशाळा व दुर्गम कंत्राटी कर्मचारी नियुक्तीला शासनाची पसंती राज्यात कंत्राटी कर्मचाऱ्याऱ्यांची नियुक्ती करण्यात येणार नसल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र



फडणवीस यानी सांगितले होते, मात्र त्यांच्या कार्यकाळातच कंत्राटी नियुक्त्यांचे सोपस्कार पार पडले जात आहेत. मागील २० वर्षापासून सर्व शिक्षा अभियानातील कर्मचाऱ्यासह आदिवासी भागातील शाळाबाहा विद्यार्थिनीना शैक्षणिक प्रवाहात आणणाऱ्या कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मवारी कंत्राटी तत्त्वावर कार्यरत आहेत. यानंतर आदिवासी विकास विभाग अंतर्गत चालवल्या जाणाऱ्या आश्रमशाळांमध्ये बाह्यसंस्थेमार्फत शिक्षकासह शिक्षकेतर कर्मचाऱ्याऱ्यांची कंत्राटी तत्वावर नियुक्ती केली जाणार असल्याने शिक्षणासारख्या पवित्र क्षेत्राची खासगीकरणाकडे वाटचाल सुरू असल्याची भीती व्यक्त केली जात आहे.

भागात २ हजार ते ३ हजार लोकवस्तीसाठी एक आश्रमशाळ्य सुरू करण्यात आल्या आहेत. राज्यात आदिवासी विकास विभागांतर्गत ५५२ शासकीय आश्रमशाळा मंजूर आहेत, यापेको आदिवासी उपयोजना क्षेत्रातील ४१२. तर आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील १४० अशा एकूण ५२९ आश्रमशाळा चालवल्या जात आहेत. यात ११ इंग्रजी माध्यमाच्या शाळा असून, २५ कन्या शाळांचा समावेश आहे.

## नवी कोरी पुस्तकं



**एकसोबीस हरी पत्ती लौंग आणि मी**
: लेखकाचे नाव :
संगीता अरबुने
किंमत रु. : ३००/-
: प्रकाशन :
**शब्दालय प्रकाशन,**
श्रीरामपूर



**चल गं सये वारुळाला**
: लेखकाचे नाव :
संहिता राजन
किंमत रु. : ४४०/-
: प्रकाशन :
**शब्दालय प्रकाशन,**
श्रीरामपूर

# २,६५२ लाडक्या बहिणींकडून होणार साडेतीन कोटींची वसुली

**मुंबई :** राज्य सरकारी कर्मचारी असलेल्या २.६५२ महिलांनी लाडक्या बहिणी योजनेचा गैरफायदा घेतल्याचे सिद्ध झाले असून त्यांच्याकडून आता या रकमेची म्हणजेच ३ कोटी ५१ लाख रुपयांची वसुली करण्यात येणार आहे. प्रत्येक विभागाला त्या बाबतचा आदेश सामान्य प्रशासन विभागाकडून लवकरच देण्यात येणार असल्याची माहिती




सूत्रांनी दिली.

महाराष्ट्र सरकारची महत्त्वाकांक्षी योजना म्हणजे लाडकी बहीण, लाडकी बहीण योजनेसाठी लाखो महिलांनी अर्ज केला होता. लाडकी बहीण योजनेसाठी आलेल्या अर्जाची पडताळणी केल्यानंतर अनेक महिला अपात्र असतानाही त्यांनी या योजनेचा लाभघेतला असल्याचे समोर आले होते.

त्यानंतर या महिलांचे अर्ज बाद करण्यात आले होते. मात्र आता योजनेचा गैरफायदा राज्य सरकारी कर्मचारी महिलांनी घेतल्याच्या **(पान २ वर)**

# 'एकसोबीस हरी पत्ती लौंग आणि मी' प्रकाशित


## अरबुने लिखित ललित लेखसंग्रह

**मुंबई :** शब्दालय प्रकाशन



प्रकाशित एकसोबीस हरी पत्ती लौंग आणि मी या संगीता अरबुने लिखित ललित लेखसंग्रहाचा शनिवार ३१ मे रोजी समाज उन्नती मंडळ सभागृह माणिकपूर, वसई (पश्चिम) येथे हा प्रकाशन सोहळा पार पडला.

ज्येष्ठ पत्रकार आणि लेखक मा. श्रीकांत बोजेवार यांच्याहस्ते या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. या कायक्रमाचे अध्यक्ष ज्येष्ठ साहित्यिक मा. डॉ. सिसिलिया कार्व्हालो या होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ कवयित्री लेखिका मा. अनुराधा नेरुरकर या उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुषमा राऊत व शिल्पा परुळेकर यांनी केले. आभार लेखिका संगीता अरबुने यांनी मानले. या कार्यक्रमाचे निमंत्रक 'शब्दालय प्रकाशन'चे सुमीत लांडे, स्नेहा अरबुने या होत्या.




# पीक नुकसानभरपाईच्या मदत रकमेत आता कपात

## तीनऐवजी दोन हेक्टरपर्यंतच मिळणार मदत : राज्य सरकारचा निर्णय

**मुंबई:** अवकाळी पाऊस, अतिवृष्टी, पुराने झालेल्या शेतपिकांच्यानुकसानभरपाईच्या रकमेत राज्य सरकारने कपात केली आहे. तसेच, कमाल तीन हेक्टरऐवजी दोन हेक्टरपर्यंतच मदत देण्याचा निर्णयही घेतला आहे.



शेतकऱ्यांना किती नुकसान भरपाई द्यावी, याचे निकष राज्य आपती प्रतिसाद निधीअंतर्गत राज्य सरकारने पूर्वीच निश्चित केले होते आणि त्यानुसारच डिसेंबर २०२३ पर्यंत मदत दिली जात होती. मात्र, एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारने १ जानेवारी २०२४ रोजी एक जीआर काढला आणि मदतीचे दर आणि हेक्टरची कमाल मर्यादा यात वाढ केली. त्यानुसारच आतापर्यंत मदत दिली आत होती. राज्य आपत्ती प्रतिसाद निधीअंतर्गत निश्चित मदतीचे निकष डावलून मदतीत वाढ करण्यात आली होती. मात्र, सुत्रांनी सागितले की, राज्य आपती प्रतिसाद निधीने जे निश्चित केले आहे, त्या मर्यादितच नुकसानीसाठी मदत देणे बंधनकारक आहे, असे केंद्र सरकारने राज्याला कळविले आहे. त्यानुसार आता पूर्वीच्या म्हणजे २० मार्च २०२३ च्या निर्णयानुसार निश्चित केलेली नुकसान भरपाई आता दिली जाणार आहे. शुक्रवारचा जीआर हा १ जानेवारी २०२४ च्या जीआरवी जागा घेत असल्याचे आणि तो तत्काळ लागू केला जात असल्याचे महसूल विभागाने स्पष्ट केले.

**(पान २ वर)**

# कोलंबियाने 'ते' वक्तव्य घेतले मागे

**नवी दिल्ली :** संघर्षादरम्यान कोलंबियाने पाकिस्तानची बाजू घेतली होती. भारताने पाकिस्तानवर हल्ला केल्यानंतर तेथील मृतांप्रती कोलंबियाने संवेदना व्यक्त केल्या होत्या. मात्र, कोलंबियाने आता त्यांचं ते विधान मागे घेतलं आहे. शशी थरूर यांचं शिष्टमंडळ तेथे गेल्यानंतर हा चमत्कार घडला आहे. ऑपरेशन सिंदूरचा संदेश जगभरात पोहोचावा म्हणून भारताने सर्वपक्षीय शिष्टमंडळ अनेक देशांमध्ये पाठवले आहेत. शशी थरुर यांच्या नेतृत्त्वाखालील शिष्टमंडळ कोलंबियाला गेले होते.

# खरिपाच्या आधारभूत किमतीत भरघोस वाढ

**नवी दिल्ली :** पंतप्रधान मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत पाच महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. यातील एक निर्णय शेतकऱ्यामाठी आनंद देणारा आहे. केंद्र सरकारने खरिपाच्या एमएमपीमध्ये अर्थात किमान आधार मूल्यात वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. सरकारने २०२५ २०२६ या वर्षासाठी धान्य, मका, तुर, मूग, उडीद, सोयाबीन या खरिपाच्या पिकांसाठी किमान आधारा मूल्यात वाड केली आहे. शेतकऱ्यांना किमान आधार मूल्य देण्यासाठी



*** केंद्रीय मंत्रीमंडळाचा निर्णय**
*** दोन लाख सात हजार कोटींची तरतूद**

सरकारने यंदा दोन लाख सात हजार कोटी रुपयांची तरतूद केली आहे. यामुळे शेतकऱ्याच्या उत्पन्नात बेट बाद होणार आहे.

केंद्रीय अश्विनी वैष्णव याबाबत अधिक माहिती देताना म्हणाले की, तांदूळासाठी प्रतिकिंटल किमान २.३६९ रुपये मिळतील. सरकारी निर्णयानुसार तांदळाच्या किमान आधार **(पान २ वर)**

# महिला सुरक्षेसाठी एसटीत 'ब्लाइंड स्पॉट कॅमेरे'

## एआय तंत्रज्ञानावर आधारित एकात्मिक सुरक्षा प्रणालीचे उपमुख्यमंत्री शिंदेंकडून कौतूक

**मुंबई :** एसटी महामंडळाच्या नव्या बसेसमध्ये महिलांच्या सुरक्षेसाठी खास ब्लाइंड स्पॉट कॅमेरे बसविण्यात आले आहेत. यामुळे हे कॅमेरे ३६० अंशातून निगराणी करणार आहेत. त्यामुळे एसटीच्या येणाऱ्या नवीन बसेस प्रवासासाठी अधिक सुरक्षित असतील, असे मत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केले. ते ठाण्यात एआय तंत्रज्ञानावर आधारित सुरक्षा प्रणाली बसवलेल्या स्मार्ट एसटी बसेसची पाहणी करताना बोलत होते. यावेळी त्यांच्या सोबत परिवहन मंत्री आणि एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक आणि एसटीचे अधिकारी उपस्थित होते

उपमुख्यमंत्री शिंदे पुढे म्हणाले की, सध्या दररोज सरासरी ५५ लाख प्रवाशांना दळणवळण सेवा देणारी एसटी भविष्यात अधिक सुरक्षित झाली पाहिजे, या उद्देशाने एआय तंत्रज्ञानावर आधारित एकात्मिक सुरक्षा प्रणाली नव्या बसेस ना बसविण्यात येणार आहे. चालकाच्या बस चालवण्याच्या पद्धतीपासून बसमध्ये

बसलेल्या प्रवाशांच्या हालचालीवर देखरेख करणाऱ्या सीसीटीव्ही कॅमेरा बरोबरच मनोरंजनासाठी वायफाय, जाहिरात प्रसारासाठी एलईडी स्क्रीन, तसेच जीपीएस प्रणाली सह फोम बेस आग प्रतिबंधक प्रणाली देखील बसविण्यात येणार आहे. या स्मार्ट बसेस बनवण्यासाठी एसटी महामंडळाचे अध्यक्ष आणि परिवहन मंत्री प्रताप





सरनाईक हे आग्रही होते. त्यांच्या सातत्य पूर्ण प्रयत्नांचे कौतुक करावं तितकेच थोडंच आहे असेही एकनाथ शिंदे यावेळी म्हणाले. कारण त्यांनी भविष्याचा विचार करून एसटीमध्ये आमुलाग्र बदल करण्याचा ध्यास घेतला आहे. त्यांच्या प्रयत्नाला महाराष्ट्र शासनाची योग्य ती साथ लाभेल याची मी यावेळी ग्वाही देतो असे उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले. प्रगत ड्रायव्हर सहाय्य प्रणाली आणि ड्रायव्हर मॉनिटरिंग कॅमेरा - समोरून होणाऱ्या धडकेची सूचना, लेन बदलण्याची सूचना, ड्रायव्हर स्थिती निरीक्षण, पादचाऱ्यांशी होणाऱ्या धडकेची सूचना इत्यादी सुविधा असणार आहेत. त्याचबरोबर मार्ग प्रदर्शनासाठी तसेच जाहिरातीसाठी तीन एलईडी स्क्रीन असतील.

# कृषिमंत्रिपद म्हणजे ओसाड गावची पाटीलकीच : कोकाटे

**मुंबई :** कृषिमंत्रिपद म्हणजे ओसाड गावची पाटीलकीच आहे आणि मला हे खाते दिले आहे, असे विधान माणिकराव कोकाटे यांनी शुक्रवारी छत्रपती संभाजीनगरमध्ये केले. अ. भा. बळीराजा संघटना भारततर्फे एमजीएमच्या आर्यभट्ट सभागृहात शेतकऱ्यांच्या गुणवंत पाल्यांच्या सत्कार समारंभात ते बोलत होते. पुन्हा एकदा वाद निर्माण करणारे वक्तव्य करून टीकेला आमंत्रण दिल्याचे दिसत आहे. नाशिक जिल्ह्याच्या सिन्नर तालुका दौऱ्यात नुकसानग्रस्त शेतीची पाहणी करताना "ढेकळांचे पंचनामे करायचे का?" असे वक्तव्य करून शेतकऱ्यांच्या भावना दुखावल्या होत्या.

# रेल्वेकडून धाराशिवचे नामांतर फायनल

## अहिल्यानगर व छत्रपती संभाजीनगर प्रतीक्षेत




**अहिल्यानगर :** हजारो कोटींच्या खचनि महाराष्ट्रातील रेल्वे नेटवर्क प्रशस्त करणाऱ्या केंद्र सरकारने महाराष्ट्रातील उस्मानाबाद रेल्वे स्थानकाचे नाव आणि कोड बदलवून धाराशिव केले आहे. सोबतच राज्यातील पुन्हा छत्रपती संभाजीनगर आणि अहिल्यानगर ही दोन रेल्वे स्थानकांची नावं आणि कोड भारतीय रेल्वेच्या नकाशावर बदललेली दिसणार आहे.

अमृत भारत स्टेशन योजना आणि दुसऱ्या वेगवेगळ्या योजनांनुसार रेल्वेच्या नुतनीकरणाचा आणि विकास कामांचा चडाका सर्वत्र सुरू आहे. अनेक स्थानकांचा चेहरा मोहरा बदलून या स्थानकांवर प्रवाशांसाठी अनेक सोयी-सुविधा निर्माण करण्यात आल्या आहेत. सोबतच नवीन सेकंड, थर्ड आणि फोर्थ लाईनची (ट्रॅकची) निर्मिती, त्यासाठी जागोजागी बांधण्यात आलेले ओव्हर ब्रीज आणि अंडर ब्रीज, ॲटोमेटीक सिमल सिस्टमसह वेगवेगळ्या नव्या सिस्टम सुरू करून एकूणच भारतीय रेल्वेच्या संपूर्ण नेटवर्कला नवीन लूक देण्याचे प्रयत्न सुरू आहेत. हे करतानाच वर्षभरापूर्वी महाराष्ट्रातील चार रेल्वे अंमलबजावणीसाठी उच्चस्तरावर प्रयत्न अहिल्यानगर हे स्थानक मध्य रेल्वेच्या तर छत्रपती संभाजीनगर स्थानक दक्षिण मध्य रेल्वेच्या कार्यक्षेत्रात येते. या दोन्ही स्थानकांच्या नामांतराच्या निर्णयाची लवकरच अंमलबजावणी केली जाणार असून, उच्चस्तरावर तसे प्रयत्न सुरू असल्याचे संबंधित रेल्वे अधिकाऱ्यांनी सांगितले आहे.

स्थानकांची नावं बदलविण्याचाही निर्णय घेण्यात आला होता. त्यानुसार, दक्षिण पूर्व मध्य रेल्वेच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या नागपूरच्या ईतवारी रेल्वे स्थानकाचे नाव 'नेताजी सुभाषचंद्र बोस ईतवारी रेल्वे स्थानक' असे करण्यात आले. आता भारतीय रेल्वे कॉन्फरन्स असोसिएशनने उस्मानाबाद रेल्वे स्थानकाच्या नवीन नावाला रेल्वेकडून धाराशिवचे नामांतर फायनल आणि कोडला मंजूरी दिली आहे. आधी या स्थानकाचे नाव उस्मानाबाद रेल्वे स्टेशन आणि कोड यूएमडी होता. तर आता रेल्वेच्या नकाशावर या स्थानकाचे नाव धाराशिव तर कोड डीआरएसव्ही राहणार आहे. १ जूनपासून त्याची अंमलबजावणी होणार आहे. त्यासाठी ३१ मे च्या रात्री ११.४५ पासून तो पुढच्या पावणेदोन तासांसाठी प्रवासी आरक्षण प्रणाली (पीआरएस) बंद केली जाणार आहे. अशा प्रकारे महाराष्ट्रातील दोन रेल्वे स्थानकांची नावं बदलली गेली आहे. तर, अहमदनगर आणि औरंगाबाद रेल्वे स्थानकाचे नाव बदलाच्या प्रतिक्षेत आहे. आधी झालेल्या निर्णयानुसार, अहमदनगर रेल्वे स्थानकाला अहिल्यानगर रेल्वे स्थानक आणि औरंगाबाद स्थानकाला छत्रपती संभाजीनगर रेल्वे स्थानक म्हणून नाव दिले जाणार आहे.

---

## '...तर पाकिस्तानचे ४ तुकडे झाले असते'

### राजनाथ सिंह यांचा INS विक्रांतवरुन मोठा खुलासा



**नवी दिल्ली :** पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने ऑपरेशन सिंदूरद्वारे पाकिस्तानला त्यांच्याच शब्दात धडा शिकवला. या ऑपरेशनमध्ये भारतीय हवाई दलाने महत्त्वाची भूमिका बजावली होती. दरम्यान, आता संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी नौदलाबाबत एक मोठा खुलासा केला आहे. संरक्षण मंत्री आज नौदलाचे लढाऊ जहाज आयएनएस विक्रांतवर गेले होते. यावेळी त्यांनी नौदल अधिकाऱ्यांची भेट घेतली आणि नौदलाबद्दल महत्त्वाची माहिती दिली.

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह म्हणाले, ऑपरेशन सिंदूर अद्याप संपलेले नाही. जर पाकिस्तानने काही चूक केली तर यावेळी त्याला सावरण्याची संधीही मिळणार नाही. आमचे नौदल त्सुनामी आणू शकते. पाकिस्तानला असे उत्तर देऊ की, त्याने कधी विचारही केला नसेल. पाकिस्तान वारंवार चर्चेचा प्रस्ताव देत आहे. कालच पाकिस्तानी पंतप्रधान चर्चेबद्दल बोलले. पण, आमची स्पष्ट भूमिका आहे की, यापुढे फक्त दहशतवाद आणि पीओकेवरच चर्चा होणार.

## कृषी विज्ञान केंद्राच्यावतीने सात तालुक्यांमध्ये विकसित कृषी संकल्प अभियान

### दहेगाव व रांजणगाव येथे अभियानाला प्रारंभ


**लोणी :** शेतकऱ्यांमध्ये आधुनिक तंत्रज्ञान आणि नवीन बियाणाच्या जातीबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी २९ मे ते १२ जून या कालावधीत विकसित कृषी संकल्प अभियान ही देशव्यापी मोहीम सुरू झाली. या मोहिमेचा शुभारंभ राहाता तालुक्यातील दहेगाव आणि रांजणगाव या गावांमधून झाला. कृषी विज्ञान केंद्र बाभळेश्वर, कृषी विभाग, महाराष्ट्र शासन, केंद्र, आणि राज्य पातळीवरील संस्था, महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी आणि आत्मा अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने अहिल्यानगर जिल्ह्यातील राहाता, श्रीरामपूर, राहुरी, कोपरगाव, अकोले, संगमनेर आणि पारनेर या तालुक्यांमध्ये ही मोहीम राबवली जाणार आहे, अभी माहीती केंद्राचे प्रमुख शास्मज्ञ शैलेश देशमुख यांनी दिली.

या मोहिमेतून पतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या लॅब टू लँड, शेतीचे उत्पादन दुप्पट करणे, शेतकऱ्यांमध्ये पाणी आणि खत वापर याविषयी जनजागृती, खरीप हंगामातील पिकांचे सुधारित तंत्रज्ञान, नवीन बियाणाच्या जाती, शासकीय योजना, मृदा आरोग्य कार्ड चा प्रभावी वापर आणि खरीप पिकांचे उत्पादन तंत्रज्ञान, पीक विमा योजना शेतीक्षेत्रात यांत्रिकीकरणाचा वापर, ए. आय. तंत्र, फळबाग लागड, तंत्रज्ञान शेतीपुरक व्यवसाय याविषयी सविस्तर मार्गदर्शन गावातील शेतकऱ्यांना मिळणार आहे. कृषी विज्ञान केंद्रातील शाखज्ञ, कृषी विद्यापीठतील शास्त्रज्ञ, कृषी विभागातील अधिकारी, प्रयोगशिल शेतकरी गावपातळीवर शेतकऱ्यांना विविध तंत्रज्ञानाची माहिती थेट बांधावर जाऊन देणार आहे. या माध्यमातून शेतकऱ्यांमध्ये विविध तंत्रज्ञानाची माहिती देण्याबरोबरच शेतकऱ्यांना खरीप पिकाचे उत्पादन तंत्रज्ञान लागवड पद्धत, बीज प्रक्रिया, जैविक खते आणि जैविक औषधांचा वापर त्याचबरोबर पाणीबचत आणि फळबाग तंत्रज्ञानाबरोबरच विविध शेतीपूरक व्यवसायाची माहिती दिली जाणार आहे. यावेळी विलास गायकवाड, आबासाहेब भोरे, शैलेश देशमुख, डॉ. विजय काकडे, डॉ. गोरक्ष वाकचौरे, आदी उपस्थित होते.

---

# सरकारी कार्यालये होणार पेपरलेस

### फडणवीस सरकारकडून कागदी फाईलवर बंदी; १ जूनपासून स्वीकारणार ई फाईल



**मुंबई :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारने गुरुवारी (दि.२९) अध्यादेश काढून सरकारी कार्यालयात कागदी फाईल्सला मनाई करण्यात आली आहे. येत्या १ जूनपासून महाराष्ट्र सरकार दरबारी कागदी फाईल स्विकारण्यास मनाई करण्यात आली आहे. एक तारखेपासून ई फाईल्सची सक्ती करण्यात आली आहे. त्यामुळे यापुढे फक्त ई फाईल्सच्या माध्यमातूनच कामकाज बालणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

स्कॅन केलेल्या ई फाईल आता सरकारी कार्यालयात स्विकारल्या जाणार असल्याने सरकारी कार्यालये पेपालम होणार आहेत. बापूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महायुती सरकारच्या दुसरया टर्ममध्ये मोठ्या प्रमाणात तंत्रज्ञानाचा वापर पाहायला मिळणार असल्याचे पूर्वीच म्हटले होते. तंत्रज्ञानाचा वापर वाढतानाच एका टेबलवरची फाईल दुसर्या टेबल जातानाचा वेग वाहल्याचेही आपल्याला पाहायला मिळणार आहे. केंद्राच्या धर्तीवर राज्यात देखील शासकीय कामकाजाच्या फाईल्स निर्णयासाठी चार स्तरापर्यंतच पाठविण्याच्या सूचना मुख्यमंत्र्यांनी प्रशासनाला दिल्या आहेत. राज्यातील सर्व शासकीय कार्यालयांमध्ये 'ई-ऑफिस' प्रणालीचा वापर सुरू केल्यास कामकाजाला गती येईल, शिवाय कामकाज संपूर्णपणे कागदविरहीतः (पेपरलेस) होणार असल्याने मुख्यमंत्र्यांकडे निर्णयासाठी येणारी फाईल विविध ८ स्तरांमधून येत असल्याची माहिती आहे. वा अधिकच्या स्तरामुळे संबंधित विषयांच्या फाईल्सवर निर्णय होण्यास विलब लागतो. याचमुळे वेगवान कारभारासाठी आता फाईल्स सादर करण्याचे स्तर कमी करण्याच्या सूचना मुख्यमंत्र्यांकडून देण्यात आल्या होत्या. फक्त चार स्तरांवरुनच ही फाईल मुख्यमंत्र्यांकडे पाठवण्याचे निर्देश दिले गेले होते.

> **अधिक सुलभता येणार आहे**
>
> त्यामुळे येत्या १ जूनपासून राज्याच्या सर्व कार्यालयांमध्ये 'ई-आफिस' प्रणाली सुरू करण्याबर मोठ्या प्रमाणात भर दिला जाणार आहे. सर्व कार्यालयांत 'ई-ऑफिसेस'चा वापर वाढला की मोबाईलवरही कामकाजाच्या फाईल्स, कागदपत्रे पाहता येणे सोयीचे होणार आहे. संबंधित फाईल्सवर तातडीनं निर्णयही देता येणार आहे.

## १४ कोटींच्या ड्रग्ज प्रकरणात तेलंगणातून एकास अटक

**श्रीरामपूर :** येथील एमआयडीसी परिसरामध्ये पोलिसांनी पकडलेल्या सुमारे १४ कोटी रुपयांच्या ड्रग्ज प्रकरणात तेलंगणा येथून अमर देशमुख यास अटक केली असून त्याला शुक्रवारी न्यायालयासमोर हजर केले असता ४ जून पर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

यासंदर्भात पोलिस उपाधिक्षक डॉ. बसवर-ाज शिवपुजे यांनी माहिती देताना सांगितले की, बुधव-ारी (ता.१४) श्रीरामपूर एमआयडीसी परिसरात टेम्पो (क्र. एमएच २० बीटी ०९५१) मधून अंमली पदार्थाची वाह-तूक केल्याप्रकरणी कारवाई करण्यात आली होती. चालक मिनीनाथ विष्णू राशीनकर (रा. धनगरवाडी, ता. राहाता) याला अटक करण्यात आली. त्यानंतर सागर भुसारी (रा. धनगरवाडी) याला अटक करण्यात आली. त्याच्या चौकशीत विश्वानाथ कारभारी शिपणकर (रा. दौंड, जि.पुणे) व अमर देशमुख (रा. कराड, जि. सातारा) यांची नावे पुढे आली.

---

## पान १ वरुन

### २,६५२ लाडक्या बहिणींकडून होणार साडेतीन कोटींची वसुली

तक्रारी आल्यानंतर १.२० लाख महिला सरकारी कर्मचाऱ्यांनी लाडकी बहिण योजनेला लाभ घेतल्याची माहिती उघडकीस आली आहे.

माहिती व तंत्रज्ञान विभागाला सामान्य प्रशासन विभागाने १ लाख ६० हजार कर्मचाऱ्यांचा युआयडी डेटा उपलब्ध करून दिला. सेवार्थ प्रणालीवर या कर्मचाऱ्यांची नावे नोंदविलेली होती.

त्यापैकी किती महिलांनी लाडकी बहीण योजनेचा लाभघेतला, हे तपासण्यासाठी मोहीम हाती घेण्यात आली होती. त्यात २६५२ महिला कर्मचाऱ्यांच्या बँक खात्यात थेट पैसा गेला असे निदर्शनास आले. त्यांनी ऑगस्ट २०२४ पासून एप्रिलपर्यंत म्हणजे ९ महिन्यांत प्रत्येकी १३ हजार ५०० रुपये घेतले. याचा अर्थ ३ कोटी ५८ लाखांची कमाई त्यांनी केली असल्याचे समोर आले आहे.

सरकारी कर्मचाऱ्यांना या योजनेचा लाभ घेता येणार नाही असे शासन निर्णयातच स्पष्ट करण्यात आले होते. तरीही महिला कर्मचाऱ्यांनी अर्ज भरले तसंच योजनेचा लाभही घेतला आहे. यात वर्ग तीन आणि वर्ग चारच्या महिला कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. आणखी सहा लाख कर्मचाऱ्यांची अशाच पद्धतीने तपासणी केली जाणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

### पीक नुकसान भरपाईच्या मदत रकमेत आता कपात

अर्थात १ जानेवारीचा जीआर आता गैरलागू झाला. राज्य मंत्रिमंडळाच्या २७ मेच्या बैठकीत २७ मार्च २०२३ व्या निर्णयानुसार मदतीचा निर्णय घेण्यात आला होता.

१ जानेवारी २०२४ रोजी महसूल ने जीआर काढला. त्यात नोव्हेंबर २०२३ मधील अवकाळी व गारपिटीने तसेच पुढील कालावधीत नैसर्गिक आपत्तीने होणाऱ्या पीक नुकसानीसाठी राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या निकषांबाहेर जाऊन मदत करण्यात येत असल्याचे जाहीर केले होते. मदतीचे हे स्वरूप मंत्रिमंडळाच्या १२ डिसेंबर २०२३ च्या बैठकीत निश्चित करण्यात आले होते. जानेवारी २४ मध्ये निकष डावलून जी वाढीव मदत शेतकऱ्यांना देण्यात आली, निवडणूक प्रचारात महायुतीने हा मुद्दा उचलून धरला होता.

### खरिपाच्या आधारभूत किमतीत भरघोस वाढ

मूल्यात ९६९ रुपयांची वाढकरण्यात आली आहे. शेतकऱ्यांना तूर डाळीसाठी प्रति किंटल किमान आठ हजार रुपये मिळतील. सरकारने तूर डाळीच्या किमान आधार मूल्यात ४५० रुपयांची वाढ केली आहे. उडदाच्या डाळीचे खरिपाच्या आधारभूत किंमतीत भरघोस वाढ

किमान आधार मूल्य ४०० रुपयांनी वाढवून ७,८०० रुपये करण्यात आले आहे. मूग डाळीचे किमान आधारमूल्य ८६ रुपयांनी वाढवून ८,७६८ रुपये करण्यात आले आहे. मोदी सरकारने सत्तेत आल्यापासून अकरा वर्षात तेलबिया, डाळी आणि कापसाच्या किमान आधार मूल्यात सुमारे पन्नास टक्के वाढ केली आहे.

किसान क्रेडिट कार्डद्वारे शेतकऱ्यांना शेतीच्या कामांसाठी आवश्यक पैसे उपलब्ध करून देण्यासाठी व्याज अनुदान योजनेला मान्यता देण्यात आली आहे. या योजनेंतर्गत शेतकऱ्यांना वार्षिक ७टक्के व्याजदराने तीनलाख रुपयांपर्यंत कर्ज मिळेल, ज्यामध्ये १.५ टक्के सवलत आणि ३ टक्के प्रोत्साहनाची तरतूद आहे, ज्यामुळे प्रभावी दर ४ टक्क्यांपर्यंत कमी होईल. या योजनेंतर्गत हमीशिवाय २ लाख रुपयांपर्यंत कर्ज उपलब्ध होणार आहे.

## आठवडाभरात तालुक्याला गोड बातमी मिळेल

### प्राजक्त तनपुरे यांच्या विधानाने तर्कवितर्कांना जोर




**राहुरी :** डॉ तनपुरे कारखान्याच्या निवडणुकीच्या प्रचार सांगता सभेच्यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांनी मोठं विधान केल आहे. त्यांच्या या विधानामुळे राहूही तालुक्यातील राजकीय ढवळून निघालं आहे. मी मतुतारीफवा निष्ठावंत आहे. सहकार खाते मघड्याळाफकडे आहे, असे सूचक म्हणत, येत्या आठवडाभरात तालुक्याला गोड बातमी देणार, यामुळे मुखद धक्का मिळेल, कारखाना चालू करण्यात कोणतीही अडचण येणार नाही, असे प्राजक्त तनपुरे यांनी म्हटले आहे.

कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अरुण तनपुरे यांच्या नेतृत्वाखाली जनसेवा मंडळ पॅनल उभा करण्यात आलेला आहे. कारखाना चालविण्याचे शिवधनुष्य अरुण तनपुरे पांनी उचलले आहे. तनपुरे कारखान्याची निवडणूक झाल्यावर आठवडाभरात तालुक्याला गोड बातमी मिळेल, असे अरुण तनपुरे यांनी म्हटले. हाच धागा पकडत माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांनी, मी तुतारीचा निष्ठावंत आहे. सहकार खाते घड्याळाकडे आहे. येत्या आठवडाभरात तालुक्याला सुखद पक्का मिळेल, कारखाना चालू करण्याला कोणतीही अडचण येणार नाही, असेही म्हटले आहे.

माजी मंत्री तनपुरे यांनी अचानक केलेल्या या विधानामुळे तालुक्यात वेगवेगळ्या राजकीय चर्चांना तोंड फुटलं आहे. त्यामुळे माजी मंत्री तनपुरच्या पुढील राजकारणाची कोणती दिशा गोड असेल? कोणता सुखद धक्का बसणार आहे? या सर्व गोष्टींच्या चर्चा आता सुरू झाल्या आहेत. सध्या अजितदादा यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये मोठ्या प्रमाणात इनकमिंग वाढले आहे. विशेष करून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षावतीने अनेक आजी-माजी नेते अजितदादांच्या पक्षात चालले आहेत. या सर्व गोष्टी सूचक असून प्रचार सांगता सभा त्यामुळे हा प्राजक्त तनपुरे वानी कारखाना निवडणुकीच्या निमित्ताने लवकरच गोड बातमी देईल, असे विधान करून राजकारणात एक वेगळ्या प्रकारची खळबळ उडवून दिली आहे. मागील पंचवार्षिकमध्ये सत्ताधाऱ्यांना विरोधाला विरोध केला नाही. तनपुरे कारखाना मागील तीन वर्षापासून बंद असूनही कारखान्याला अडचणीत आणण्याचे कधीच प्रयत्न केले नाही. बाउलट प्रसाद शुगर जर नसता, तर शेतकऱ्यांचे हाल झाले असते. कारखाना काढणे ही काही साधी सोपी गोष्ट नाही. कारखाना चालविण्याचा निर्धार अरुण तनपुरे यांनी केला आहे. त्यामुळे निवडणुकीत लढत असलेल्या तिन्ही पॅनलमध्ये कारखाना चालविण्याची क्षमता असलेले अरुण तनपुरे हेच एकमेव नेतृत्व आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांनी सभासदानी कामधेनु योग्य व्यक्तीच्या हातात द्यावी व आपली कामधेनु वाचविण्यासाठी प्रयत्न करावेत असे आवाहन यावेळी प्राजक्त तनपुरे यांनी केले.

| | | |
|---|---|---|
| चिमण्या चिवचिवल्या | - मा.रा.लामखडे | रु. १०० |
| टिकली तर टिकली | - श्रद्धा बेलसरे | रु. १५० |
| रानसय | - भास्कर चंदनशीव | रु. २२५ |
| निःशब्द कोलाहल | - धनंजय गोवर्धने | रु. ११० |
| आधुनिक मराठी गेय कविता | - डॉ.सयाजीराजे मोकाशी | रु. १७५ |
| मुके जाते गाणे गाते | - विनायक बंगाळ | रु. ९० |
| कानडी मुलखातील मुशाफिरी (प्रवास वर्णन) | - मा.रा.लामखडे | रु. २२० |
| पैंजणांचे झाड | - सिसिलिया कार्व्हालो | रु. १५० |
| काळोखाला दूर सारून | - प्रतिभा जाधव | रु. १४० |
| साळुंकीची सावली | - महावीर जोंधळे | रु. १८० |
| उत्कर्षवाटा (पुणे विद्यापीठ) | - संपा.डॉ.लांडगे, डॉ.रोंगटे, डॉ.सांगळे | रु. १२० |
| रंग जीवनाचे | - बबन काकडे | रु. २५० |
| च्यामारी | - डॉ.प्रमोद काळे | रु. १८० |
| कुब्र | - सत्यजित पाटील | रु. २३० |
| **नाटक/एकांकिका/चित्रपट विषयक** | | |
| तुंबारा | - सयाजी शिंदे | रु. २५० |
| तृतीय रत्न (नाटक) (जळगाव विद्या. अभ्यासक्रमात समाविष्ट) | - ले.जोतिराव फुले, संपा. दत्ता भगत | रु. २२५ |
| माझं घर | - जयंत पवार | रु. १६० |
| जनक | - शार्दुल सराफ | रु. १५० |
| हंडाभर चांदण्या (संहिता आणि लेख) (पुणे विद्यापीठ) | - दत्ता पाटील/ संपा.सतिश बडवे | रु. १५० |
| राहिले दूर घर माझे | - शफाअत खान | रु. १४० |
| चौक | - मकरंद साठे | रु. १२० |
| मंथरक आणि इतर एकांकिका | - जयसिंग पाटील | रु. ९० |
| जाता नाही जात | - सिद्धार्थ तांबे | रु. १५० |
| सप्तरंगी एकांकिका | - दयाराम गिलाणकर | रु. १२० |
| प्रत्ययकारी परदेशी सिनेमा | - उदय कुलकर्णी | रु. ६५० |
| **चरित्र/आत्मचरित्र** | | |
| श्री.संत चोखामेळा : चरित्र आणि अभंग | - संपा.स.भा.कदम, प्रस्ता.भालचंद्र नेमाडे | रु. १६० |
| जिजी (शेतकरी आईची जीवनगाथा) | - प्रा.सौ.लिला जंजिरे | रु. २०० |
| कोकरूड ते बर्मिंगहॅम | - प्रा.अब्दुलगनी अत्तार | रु. ३७५ |
| सुंबरान | - दिनकर यमनाजी शेलार | रु. २५० |
| पंख गळून गेले तरी | - सुधीर देवरे | रु. ८० |
| स्त्रीरत्न क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले | - रावसाहेब चोले | रु. ७५ |
| मलिक अंबर | - वि.स.वाकसकर | रु. १०० |
| लावणी सम्राज्ञी (यमुनाबाई वाईकर यांचे चरित्र) | - प्रभाकर ओव्हाळ | रु. २५० |
| कांताबाई सातारकर | - संतोष खेडलेकर | रु. २०० |
| स्वातंत्र्यसूर्य महाराणा प्रताप | - अभिमन्यू सूर्यवंशी | रु. २०० |
| संत मीराबाई | - अभिमन्यू सूर्यवंशी | रु. २०० |
| मी तो हमाल | - आप्पा कोरपे | रु. १५० |
| प्रकाशाची बेटे | - अभिमन्यू सूर्यवंशी | रु. २२० |
| **कविता संग्रह** | | |
| बालकवींच्या निवडक कविता | - संपा.ना.धों.महानार | रु. ११५ |
| वसा | - वसंत सावंत | रु. ७५ |
| सुमती लांडे : समग्र कविता | - संपादक : कविता मुरुमकर/ सुमती लांडे | रु. ५९९ |
| कमळकाचा | - सुमती लांडे, चित्रप्रत्यय- प्रभाकर कोलते | रु. २०० |
| वाहते अंतर | - सुमती लांडे | रु. ९० |
| तुकाराम : अहिराणीत निरुपण | - डॉ.एस.के.पाटील | रु. ५२५ |
| बोलावे ते आम्ही (साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त) | - श्रीकांत देशमुख | रु. ३८० |
| येरू म्हणे | - प्रवीण बांदेकर | रु. १०० |
| बोलावे ते आम्ही | - श्रीकांत देशमुख | रु. ३८० |
| ऋतुपर्णाच्या कविता | - जितेंद्र कुंवर | रु. ३०० |
| आवानओल | - अजय कांडर | रु. १०० |
| प्रलयानंतरची तळटीप | - सुचिता खल्लाळ | रु. २२५ |
| दंडविधान | - मनोज सुरेंद्र पाठक | रु. २७० |
| एक शून्य प्रतिक्रिया | - व्यंकटेश चौधरी | रु. २०० |
| माणूस उकरून काढावा लागतोय | - सिसिलिया कार्व्हालो | रु. २०० |
| ज्याचा त्याचा चांदवा | - अंजली ढमाळ | रु. २२० |
| दुभंगवाणी | - डॉ.नंदू मुलमुले | रु. १५० |
| गरम झळा आणि संभ्रमाची फळे | - पोपट सातपुते | रु. १०० |
| भुईशास्त्र (साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त) | - ऐश्वर्य पाटेकर | रु. २२० |
| भुई तापाचे बळी | - प्रभाकर महाजन | रु. १६० |
| हिन्दोल | - संध्या शहापुरे | रु. २५० |
| अस्वस्थ क्षणांचे पाश | - समाधान महाजन | रु. १२० |
| विसविशीत जगण्याच्या उंबरठ्यावरून | - विलास माळी | रु. २०० |
| तहानलेले पाणी | - मारुती सावंत | रु. १२० |
| पाच बिघे | - लक्ष्मण बारहाते | रु. ८० |
| रक्तसेतू | - सुखदेव ढाणके | रु. १०० |
| हुर्दुक | - सुखदेव ढाणके | रु. ९० |
| ओले अथांग श्वास | - रामकली पावसकर | रु. १०० |

| | | |
|---|---|---|
| स्त्री कुसाच्या कविता | - लक्ष्मण महाडीक | रु. १२५ |
| कुणब्याची कविता | - लक्ष्मण महाडीक | रु. १३० |
| बळीचं जिणं | - दयाराम गिलाणकर | रु. १०० |
| कविता दिक्षेच्या | - महेंद्र भास्कर पाटील | रु. ८० |
| मेघवृष्टी | - जयराम खेडेकर | रु. १०० |
| विलग | - गणेश आत्माराम वसईकर | रु. ९० |
| वादळवाट | - वंदना महाजन | रु. १५० |
| जिवन नरहची आसामी कविता | - अनु.शोभा नाईक | रु. ७५ |
| ब्रम्हसोपान | - रेषा आकोटकर | रु. ९० |
| एक टुकडा आसमाँ का | - विश्वजीत तुळजापूकर | रु. ७५ |
| एका गोरज घडीला (O.P) | - अरुण सांगोळे | रु. ७५ |
| नांगरून पडलेलं शतक | - रमेश चिल्ले | रु. ८० |
| अनुकार | - जयश्री पाठक | रु. ९० |
| खानदानी | भगवान देशमुख | रु. ८० |
| जगण्याच्या कोलाहलात | - गणेश मरकड | रु. २०० |
| आयडियल स्टेटच्या हद्दीबाहेरून | - सिद्धार्थ तांबे | रु. ७० |
| ओळींनी अंबर व्हावे | - रमेश मगरे | रु. ११० |
| निरिच्छ नभ | - विनायक त्र्यं.पाटील | रु. ७० |
| रूप-अरूपाचे | - अशोक सोनवणे | रु. १०० |
| भोग सरू दे उन्हाचा | - कैलास दौंड | रु. ९० |
| इंद्रधनूच्या कमानीवर | - राजेश जाधव | रु. १०० |
| अक्षरऋतू | - प्रमोद जोशी | रु. १०० |
| रानभरारी | - गुंफा कोकाटे | रु. ८० |
| पाऊल खुणा | - संजीव दुधाट | रु. ८० |
| बाणगंगेच्या तिरी | - डॉ.मधुकर कवडे | रु. ९० |
| जन्मांतर | - शुभम अनिल दुरगुडे | रु. १२० |
| निवडक कविता | - संपा.प्रा.डॉ.वसंत शेकडे | रु. १०० |
| फिर्याद | - हिरा बनसोडे | रु. १०० |
| दाहगाथा | - कैलास सलादे | रु. १२० |
| अकुतोभय | - निलेश शेळके | रु. १४० |
| संदर्भासहित स्पष्टीकरण | - इरावती इंगवले-यादव | रु. १२० |
| सूर्य गेला नाही अजून अस्ताला | - विनायक हिरवे | रु. १५० |
| जखमी पावलांचे ठसे | - कैलास जिजाबाई चावडे | रु. १२० |
| केकतीची फुले | - ल.सि.जाधव | रु. १०० |
| काव्यबंध (मुंबई विद्यापीठ) | - संपा.डॉ.नीलकंठ शेरे/डॉ. नानासाहेब यादव/ डॉ.जगदिश राणे | रु. २०० |
| मी मातीचे फूल | - मीनल येवले | रु. २०० |
| ऐन पस्तिशीत | - दिलीप वीरखेडे | रु. ८० |
| काव्यभान | - रविंद्र कांबळे | रु. १०० |
| धुनी (O.P) | - सुरेश सावंत | रु. २०० |
| काहीच नष्ट होत नसतं | - विजय चोरमारे | रु. १६० |
| गाव हाकेच्या अंतरावर (O.P) | - जगदीश कदम | रु. १२० |
| माणूसनामा | - कैलास पगारे | रु. १२० |
| साकल्याच्या प्रदेशात | - डॉ.सिसिलिया कार्व्हालो, डॉ.धनाजी गुरव, डॉ.निलकंठ शेरे | रु. १५० |
| अधांतर अंधारात | - महेश केळुसकर | रु. २२० |
| आत्मपीठ | - मंदाकिनी पाटील | रु. २६० |
| पद्म गोपाळ | - सौ.निर्मला काळे | रु. ३०० |
| काव्यरंग | - डॉ.आरेकर, डॉ.यादव, डॉ.राणे | रु. २२० |
| हंबरवाटा | - संतोष आळंजकर | रु. २५० |
| दंडविधान | - मनोज पाठक | रु. २७० |
| कथार्सिस | - सारिका उबाळे | रु. ३४० |
| **चरित्र** | | |
| संत गाडगेबाबा | - विजय पाटील | रु. ३० |
| बहिणाबाई चौधरी | - मृण्मयी पाटील | रु. ३० |
| अहिल्याबाई होळकर | - विजया पाटील | रु. ३० |
| स्त्रीरत्न सावित्रीबाई फुले | - रावसाहेब चौले | रु. ७५ |
| अहिल्याबाई होळकर | - मृण्मयी पाटील | रु. ५० |
| बहिणाबाई चौधरी : चरित्र आणि निवडक कविता | - सुमती पाटील | रु. ५० |
| डॉ.अब्दुल कलाम : चरित्र आणि कार्य | - सुमती पाटील | रु. ५० |
| इंदिरा गांधी : चरित्र आणि कार्य | - मृण्मयी पाटील | रु. ५० |
| पंडित जवाहरलाल नेहरु : चरित्र आणि कार्य | - सुमती पाटील | रु. ५० |
| महात्मा ज्योतिबा फुले : चरित्र आणि कार्य (O.P) | - सुमती पाटील | रु. ५० |
| राष्ट्रपिता महात्मा गांधी | - मृण्मयी पाटील | रु. ५० |
| सावित्रीबाई फुले : चरित्र आणि कार्य (O.P) | - सुमती पाटील | रु. ५० |
| सम्राट अशोक : चरित्र आणि कार्य | - सुमती पाटील | रु. ५० |
| शाहू महाराज : चरित्र आणि कार्य | - मृण्मयी पाटील | रु. ५० |
| जे.आर.डी.टाटा | - मृण्मयी पाटील | रु. ५० |
| यशस्वी भारतीय महिला (O.P) | - सुमती पाटील | रु. ५० |
| झाशीची राणी : चरित्र आणि कार्य | - सुमती पाटील | रु. १०० |
| पंडित दीनदयाळ उपाध्याय | - सुमती पाटील | रु. ५० |


| | | |
|---|---|---|
| **सामान्यज्ञान** | | |
| आधुनिक बेकरी व्यवसाय तंत्रज्ञान | - यू.डी.चव्हाण | रु. १००० |
| **शैक्षणिक/बाल/कुमार/प्रौढ साक्षर/इत्यादी** | | |
| निसर्गाकडे चला | - डॉ.गजानन पाटील | रु. १४० |
| तंत्र तणावमुक्तीचे | - डॉ.गजानन पाटील | रु. ४० |
| तंत्र व्यक्तिमत्व विकासाचे भाग १ | - डॉ.गजानन पाटील | रु. ६० |
| तंत्र व्यक्तिमत्व विकासाचे भाग २ | - डॉ.गजानन पाटील | रु. १२५ |
| मानसिक तणावमुक्त अध्यापन प्रतिमान (O.P) | - डॉ.गजानन पाटील | रु. १०० |
| पर्यावरण प्रकल्प कार्य (O.P) | - डॉ.तरुजा भोसले | रु. २५० |
| शालेय ग्रंथालय व्यवस्थापन | - डॉ.सी.श्री.पाटील | रु. १५० |
| शब्दसंपदा : निवडक भाषणे | - डॉ.भगवान सावंत | रु. ८० |
| सप्तरंगी एकांकिका | - दयाराम गिलाणकर | रु. १२० |
| आठवणी यदुनाथांच्या | - संपा.डॉ.प.शं.झेंडे | रु. ७० |
| योगासनांची ओळख | - डॉ.प.शं.झेंडे | रु. ४५ |
| अध्यात्म, विज्ञान व संस्कार मूल्य | - दत्तात्रय चिताळकर | रु. १०० |
| गीतइसापनीती | - उषा परब | रु. ८० |
| करामती प्रकाश | - विजय नांगरे | रु. ५० |
| ओंजळीतील मोती | - प्रमिला हनुमंतराव रासकर | रु. १२० |
| एड्स | - विजया पाटील | रु. १५ |
| चिकुनगुणिया | - डॉ.एस.के.पाटील | रु. १५ |
| नखे कापा - निरोगी राहा | - डॉ.राजेंद्र मलोसे | रु. ३५ |
| खानदेशी गाव | - आबा महाजन | रु. १८० |
| नखपुराण | - डॉ.राजेंद्र मलोसे | रु. १५ |
| परोपकारी शंकर | - विजय नांगरे | रु. १५ |
| बहुगुणी तुळस | - डॉ.मंगला काजळे | रु. १५ |
| आपला नांदेड जिल्हा | - सुमती पाटील | रु. ३० |
| मालगुंडचा सिद्धू | - आनंद वाघ | रु. ३०० |
| बालसंस्कार | - ताई पवार | रु. १०० |
| आम्ही भी घडणार | - ताई पवार | रु. ११५ |
| विज्ञान कोडे | - ताई पवार | रु. १२० |
| दिशा नवोपक्रमाची | - ताई पवार | रु. १४० |
| श्री गणेशा शिक्षणाचा | - ताई पवार | रु. ९० |
| छत्रपती शिवाजी राजेभोसले यांचा पवाडा | - महात्मा ज्योतीराव फुले | रु. १०० |
| गुलामगिरी | - महात्मा ज्योतीराव फुले | रु. १५० |
| शेतकऱ्याचा असूड | - महात्मा ज्योतीराव फुले | रु. १५० |
| योग - सर्वांसाठी | - आनंद वाघ | रु. २५० |
| योगा - खेळ, छंद आणि संस्कार | - आनंद वाघ | रु. २५० |
| कोवीड १९ - अकल्पीत चकवा | - आनंद वाघ | रु. २०० |
| स्त्री - पुरुष तुलना | - ताराबाई शिंदे - संपा.महेंद्र मुंजाळ | रु. १२५ |
| महाराष्ट्रातील समाजसुधारक | - अे. देशमुख | रु. ८० |
| **कृषि विषयक पुस्तके** | | |
| **डॉ. यू. डी. चव्हाण / डॉ. पी. जी. पाटील** | | |
| मधुमक्षिका पालन - आळींबी लागवड (शेतीतील जोडधंदे) | | रु. ७२० |
| पेपेन उद्योग - रेशीम उद्योग (शेतीतील जोडधंदे) | | रु. ७०० |
| कुक्कुट पालन-ससे पालन (शेतीतील जोडधंदे) | | रु. ७०० |
| शेळी पालन - मेंढी पालन (शेतीतील जोडधंदे) | | रु. ७१० |
| पशुपालन व दुग्धव्यवसाय - गांडुळ खत निर्मिती प्रकल्प | | रु. ७०० |
| वराह पालन - मत्स्य उद्योग (शेतीतील जोडधंदे) | | रु. ७०० |
| महिलांना करता येण्यासारखे उद्योग (शेतीतील जोडधंदे) | | रु. ६९० |
| कृषि अवजारे व यंत्राचा उपयोग (शेतीतील जोडधंदे) | | रु. २६० |
| मसाला प्रक्रिया उद्योग | | रु. ५७० |
| मत्स्य प्रक्रिया उद्योग | | रु. ७०० |
| आंबा-केळी-द्राक्ष प्रक्रिया उद्योग | | रु. ६५० |
| अननस-चिकू-पेरु प्रक्रिया उद्योग | | रु. ६३० |
| अंजिर-चिंच-जांभूळ-पपई-स्ट्रॉबेरी प्रक्रिया उद्योग | | रु. ६५० |
| आवळा-डाळींब-बोर-प्रक्रिया उद्योग | | रु. ६५० |
| दूध व दुग्धजन्य पदार्थ | | रु. ६५० |
| फळभाज्या प्रक्रिया उद्योग | | रु. ६४० |
| काजू-कवठ-फालसा-कृष्णफळ-करवंद-सफरचंद-कोकम-फणस-उंबर-लिची प्रक्रिया उद्योग | | रु. ६५० |
| लिंबूवर्गीय फळे प्रक्रिया उद्योग | | रु. ६३० |
| मांस-मटन-अंडी प्रक्रिया उद्योग | | रु. ६५० |
| टोमॅटो-बटाटा-कांदा-लसून-प्रक्रिया उद्योग | | रु. ६१० |
| तृणधान्य-कडधान्य-गळीतधान्य प्रक्रिया उद्योग | | रु. ७१० |
| वाईन उद्योग | | रु. ७५० |
| कृषि क्षेत्रातील कृषि उद्योग | | रु. ५५० |
| कृषि प्रक्रिया उद्योग कोश | | रु. २००० |
| अक्षय उर्जा | | रु. १७० |

**शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर यांची महत्त्वाची पुस्तके मागविण्यासाठी खालील नंबरवर संपर्क करा – मो. ९०११२०१४१४ / ९८२२५२५४४४**

CMS
CREATIK
MULTI SERVICES PVT LTD



Discover Pustakvari : The Ultimate eBook Platform
State-of-the-Art eBook Readers
Advanced Security and Technology
Intelligent Search and Realistic Viewing Experience
Expansive Content Library
Global Accessibility and Multi-Publisher Platform
Tailored Solutions for Institutes and Libraries
Interactive Learning with General Knowledge Software
Smart Recommendations and User Customization



Contact US
Email : creatikpvtltd44@gmail.com
Contact : +91 22 3599 9192 | +91 9822525444
Website : creatikmultiservices.com

Digital India Vision India MAKE IN INDIA MSME

Gut No. 125, Ranjankhol, Tal. Rahata, Dist. Ahmednagar 413709

# मान्सूनचा वेग मंदावला, पावसाची विश्रांती...

**पुणे :** मान्सूनच्या आगमनासोबतच पावसाने राज्यात धुमाकूळ घातला. मान्सून दाखल झाल्यानंतर मात्र त्याचा वेग मंदावला. यामुळे पाऊस ओसरण्याचे संकेत हवामान विभागाने दिले आहेत. येत्या २४ तासात विदर्भात जोरदार पावसाचा इशारा देण्यात आलाय. तर राज्यातील उर्वरित भागात तुरळक ठिकाणी हलक्या सरींची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

बंगालच्या उपसागरात ओडिशाच्या किनारपट्टीवर कमी दाबाच्या पट्ट्याची तीव्रता वाढली आडे. यामुळे डीप डिप्रेशन सक्रीय झाले आहे. गुरुवारी हे डीप डिप्रेशन बांगलादेशमधील सागर बेटे आणि खेपूपारा इथं पोहोचले. याची तीव्रता हळूहळू कमी होणार आहे. गुरुवारी सकाळपर्यंत राज्यात कोकण, मध्य महाराष्ट्रासह काही ठिकाणी पावसाने हजेरी लावली.

**केव्हा करणार पेरणी... कृषी विभागाचा सल्ला**

राज्यात २९ ते ३१ मे दरम्यान पुन्हा जोरदार पाऊस येण्याची दाट शक्यता असल्याने शेतकऱ्यांनी लगेच आज उद्या पेरणीची घाई करू नये, राज्यात साधारण ३ जून नंतर मान्सूनचा पहिला टप्पा किंवा स्पेल संपेल त्यानंतरच म्हणजे साधारण जूनच्या पहिल्या आठवडच्या शेवटी शेतकरी वर्गान पेरणीला सुरूवात करावी, असा सल्ला ज्येष्ठ कृषी हवामान तज्न डॉ. रामचंद्र साबळे यांनी दिला आहे. हवामान कोरडे होणार असल्यामुळे जर पेरणीची घाई केली तर शेतकऱ्यांचे नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही, असं कृषी विभागाने म्हटलं आहे.



**मुसळधार पावसाचे राज्यात २१ बळी**

गेल्या काही दिवसांत झालेल्या मुसळधार पावसामुळे राज्यात २१ जणांचा मृत्यू झाला आहे. तसेच २२ प्राणी दगावले आहेत. राज्याच्या आपत्ती व्यवस्थापन विभागातर्फे ही माहिती जाहीर करण्यात आली. सर्वाधिक मृत्यूची नोंद पुणे आणि नांदेड जिल्ह्यात करण्यात आली आहे. दोन्ही जिल्ह्यात प्रत्येकी तिघांनी जीव गमावला आहे.

शुक्रवारी विदर्भातल्या अमरावती, चंद्रपूर, भंडारा, गोंदिया या जिल्ह्यांमध्ये जोरदार पावसाची शक्यता आहे. तर बुलडाणा, अकोला, वाशीम, यवतमाळ, वर्धा, नागपूर जिल्ह्यात वीजांच्या कडकडाटासह पाऊस पडेल असा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

# देशात कोरोनाचे २७१० सक्रिय रुग्ण

**मुंबई :** देशभरात कोरोना विषाणूच्या सक्रिय रुग्णांची संख्या २७१० वर पोहोचली आहे. केरळमध्ये सर्वाधिक ११४७ रुग्ण आहेत. सक्रिय रुग्णांच्या बाबतीत महाराष्ट्र दुसऱ्या क्रमांकावर आहे. शुक्रवारी राज्यात ८४ नवीन रुग्ण आढळले, आता येथे ६८१ रुग्ण आहेत. देशातील ६० टक्के सक्रिय प्रकरणे या दोन राज्यांमध्ये आहेत.

राज्यातील कोरोनामुळे झालेला हा तिसरा मृत्यू आहे. याशिवाय महाराष्ट्र, केरळ, राजस्थान, उत्तर प्रदेश आणि मध्य प्रदेशात एकूण १३ रुग्णांचा मृत्यू झाला आहे. एकूण मृतांची संख्या १६ वर पोहोचली आहे. शुक्रवारी, गुजरातमधील अहमदाबादमध्ये एका दिवसाच्या नवजात बाळाचा कोरोना अहवाल पॉझिटिव्ह आला आहे. मुलाला आयसीयूमध्ये ठेवण्यात आले आहे. गेल्या आठवड्यात, मुलाच्या आईलाही कोरोना पॉझिटिव्ह आढळले होते, जरी आता तिचा अहवाल निगेटिव्ह आला आहे.

# वैष्णवी हगवणे प्रकरण विशेष पोलीस महानिरीक्षक सुपेकरांना भोवले

## पदावनत करून होमगार्ड उप महासमादेशकपदी नियुक्ती : फरार निलेश चव्हाण पोलीसांच्या ताब्यात

**पुणे :** वैष्णवी हगवणे प्रकरणात एक मोठी बातमी समोर आली आहे. या बातमीनुसार जालिंदर सुपेकर, विशेष पोलीस महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा यांची पद अवनत करुन उप महासमादेशक, होमगार्ड पदावर बदली करण्यात आली आहे. जालिंदर सुपेकर हे हगवणे बंधूचे मामा आहे. वैष्णवी हगवणे मृत्युप्रकरणानंतर सामाजिक कार्यकर्त्या अंजली दामानिया यांनी सुपेकर यांच्यावर गंभीर आरोप केले होते.

हगवणे बंधूंना खोट्या कागदपत्रांच्या आधारे शख परवाना देण्याचा तसेच कैद्यांना द्यायच्या साहित्या कथित ५०० कोटींच्या घोटाळा केल्याचा आरोप जालींदर सुपेकर यांच्यावर करण्यात आला आहे. वैष्णवीचं बाळ आणण्यासाठी गेलेल्या कस्पटे कुटुंबातील व्यक्तींना ज्याने बंदुक दाखवून धमकावलं त्या निलेश चव्हाणला जालिंदर सुपेकर यांनीच बंदुकीचा परवाना दिल्याचं आरोप सामाजिक कार्यकर्त्या अंजली दामानिया यांनी केला आहे. या प्रकरणात जालिंदर सुपेकर यांचा नाव आल्याने त्यांच्याकडून नाशिक,



संभाजीनगर नागपूरचा कारागृह उपमहानिरीक्षक अतिरिक्त पदाचा कार्यभार काढून घेण्यात आला होता तर आता पद अवनत करुन त्यांची बदली उप महासमादेशक, होमगार्ड पदावर करण्यात आली आहे.

तर दुसरीकडे आज वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरणात पोलिसांनी मोठी कारवाई करत फरार आरोपी निलेश चव्हाण याला नेपाळमधून अटक केली आहे. निलेश चव्हाण याला आज मध्यरात्री विमानाने पुण्यात आणले जाणार आहे. पुण्यातील मुळशी तालुक्यातील भुकूम येथे १६ मे २०२५ रोजी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते राजेंद्र हगवणे यांची सून वैष्णवी हगवणे हिने आत्महत्या केली होती. यानंतर वैष्णवीने असं टोकाचं पाऊल उचललं, यामागे हंड्यासाठी झालेला छळ, कौटुंबिक हिंसाचार, असे आरोप करण्यात आले होते. तर वैष्णवीच्या मृत्यूनंतर तिचे सासरे आणि दीर दोघंही फरार झाले होते. त्यांना आठ दिवसांनंतर पोलिसांनी अटक केली होती. लग्नाच्या वेळी ५१ तोळे सोने, एक फॉर्च्यूनर कार आणि इतर महागड्या वस्तू दिल्यानंतरही आणखी पैशांसाठी वैष्णवीचा छळ सुरु होता असा आरोप वैष्णवीच्या माहेरच्या लोकांकडून करण्यात आला आहे.

### निलेश चव्हाणला नेपाळ सीमेवरून अटक

गेल्या दहा दिवसांपासून फरार असलेला आरोपी नीलेश चव्हाण याला ३० मे (शुक्रवार) रोजी नेपाळ सीमेवरून अटक केली आहे. चव्हाणवर वैष्णवीच्या कुटुंबीयांना धमकावणे, तिच्या मुलाला बळजबरीने ठेवणे, आणि शस्त्र दाखवून धमकी देणे यांसह अनेक गंभीर आरोप होते.

## महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद यांच्या पत्रानुसार राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र, पुणे यांच्यातर्फे निवडण्यात आलेली नगरपालिका व जिल्हापरिषद शाळेंसाठी निवडक वाचनीय पुस्तकांची यांदी

| अ.नं. | पुस्तकाचे नाव | लेखक | किंमत |
|---|---|---|---|
| १ | गोष्ट कॉम्प्युटरची | संदीप लांडे | 100 |
| २ | जलऊर्जा | संदीप लांडे | 130 |
| ३ | अंतराळ- २ | संदीप लांडे | 150 |
| ४ | रोमांचकारी सफर | सौ.संज्योत बानुबाकोडे | 100 |
| ५ | पेरणी | आबा गोविंदा महाजन | 100 |
| ६ | हिऱ्यांची पिशवी | संज्योत बनूबकोडे | 100 |
| ७ | करामती प्रकाश | विजय नागरे | 150 |
| ८ | अद्भूताचा शोध | विजय नागरे | 130 |
| ९ | जग बदलणारे ५० शोध | आनंद वाघ | 120 |
| १० | घाबरलेल्या सुषमाची गोष्ट | सुमति लांडे | 130 |
| ११ | प्राणी गायब होऊ लागले | आबा गोविंदा महाजन | 150 |
| १२ | बोधकथा | मृण्मयी पाटील | 100 |
| १३ | संवेदना आणि इतर कथा | बाळ पोतदार | 110 |
| १४ | पीठाचा माठ | संतोष खेडलेकर | 100 |
| १५ | आनंदी गाणी | स्नेहा पाटील | 100 |
| १६ | मुलांसाठी शोर्यकथा | संतोष खेडलेकर | 110 |
| १७ | बिल्लू | श्यामला एस. | 100 |
| १८ | करामती मुंग्या | संज्योत बनूबकोडे | 100 |
| १९ | जलधारा | मृण्मयी पाटील | 100 |
| २० | अशी मोडली खोड | मृण्मयी पाटील | 100 |
| २१ | निसर्ग माझा सवंगडी | संदीप लांडे | 100 |
| २२ | पवन ऊर्जा | संदीप लांडे | 130 |
| २३ | निसर्गाचे संवर्धन का करावे | संदीप लांडे | 200 |
| २४ | सौर ऊर्जा | संदीप लांडे | 130 |
| २५ | शाळा सवंगडी | विजय नागरे | 130 |
| २६ | आमची शाळा | विजय नागरे | 130 |
| २७ | कौशल्य | विजय नागरे | 100 |
| २८ | इवलासा ससा | संज्योत बनूबकोडे | 100 |
| २९ | स्वातंत्र्यसंग्रामाच्या शौर्यकथा | संतोष खेडलेकर | 100 |
| ३० | पिंकू आणि सोनू | श्यामला एस. | 100 |
| ३१ | महानायक | संतोष खेडलेकर | 100 |
| ३२ | संस्कार कथामाला | संज्योत बनूबकोडे | 100 |
| ३३ | देण्याचा आनंद | संज्योत बनूबकोडे | 100 |
| ३४ | सफर जगातल्या आश्चर्याची | संतोष खेडलेकर | 120 |
| ३५ | किलबिल गोष्टी | नामदेव माळी | 150 |
| ३६ | हिम्मत | विजय नागरे | 150 |
| ३७ | बी ची गोष्ट | सुनील भोडगे | 100 |
| ३८ | दोरीची करामत | विजय नागरे | 100 |
| ३९ | ऐतिहासिक शौर्यकथा | संतोष खेडलेकर | 130 |
| ४० | चांगला मित्र | सौ.संज्योत बानुबाकोडे | 100 |
| ४१ | सईचे पंख | विजय नागरे | 150 |
| ४२ | मी अब्दुल कलाम | मृण्मयी पाटील | 100 |
| ४३ | पाण्याविषयी सर्वकाही | संदीप लांडे | 100 |
| ४४ | नाच रे मोरा | सूचित पाटील | 100 |
| ४५ | कावळा काळा कसा झाला | श्यामला एस. | 100 |
| ४६ | रोबोट माझा मित्र | विशाल तायडे | 160 |
| ४७ | उद्धट नंदू | श्यामला एस. | 100 |
| ४८ | झाडाची गोष्ट | शाल्मल लांडे | 100 |
| ४९ | चला पावसाच्या पाण्याची बचत करू | संदीप लांडे | 130 |
| ५० | कचरा व्यवस्थापन | संदीप लांडे | 200 |
| ५१ | हूशार बकरी | बाळ पोतदार | 100 |
| ५२ | आपले हरित घर | संदीप लांडे | 100 |
| ५३ | आपली हरित शाळा | संदीप लांडे | 100 |
| ५४ | मालगुंडचा सिद्धू | आनंद वाघ | 100 |
| ५५ | अद्भुत पोषोख | विजय नागरे | 160 |
| ५६ | सातपुड्याच्या जंगलामध्ये | आबा गोविंदा महाजन | 100 |
| ५७ | रणरागिणींच्या शौर्यकथा | संतोष खेडलेकर | 100 |
| ५८ | बबलू खरेदीला जातो | श्यामला एस. | 100 |
| ५९ | चिंटू नावाचा कोल्हा | श्यामला एस. | 100 |
| ६० | दोन जादूगार | रमेश महाले | 100 |
| ६१ | हरवलेला धबधबा | श्यामला एस. | 100 |
| ६२ | चतुर कोल्हा वेंधळा बोकड | मृण्मयी पाटील | 100 |
| ६३ | दिनेशची समुद्र किनाऱ्यावरील सफर | श्यामला एस. | 100 |
| ६४ | प्राणीसृष्टी भाग-१ | रमेश महाले | 200 |
| ६५ | कागा आणि नारळ | श्यामला एस. | 100 |
| ६६ | दिशा नवोपक्रमाची | ताई पवार | 160 |
| ६७ | नशिबाची साथ | विजय नागरे | 100 |
| ६८ | वृक्षगान | लैला महाजन | 100 |
| ६९ | वृक्षवल्ली आम्हा सोयरे | लीलावती भागवत | 100 |
| ७० | म्हणींचा शोध मनास बोध | म.ना. जोशी | 100 |
| ७१ | एकमेका सहाय्य करू | म.ना. जोशी | 100 |
| ७२ | राजा पिल्लाची गोष्ट | लीलावती भागवत | 100 |
| ७३ | छान छान गोष्टी | रोहिणी कुलकर्णी | 100 |
| ७४ | बछडा | मुकुंद निगवेकर | 100 |
| ७५ | संस्कार गोष्टी | म.ना. जोशी | 100 |
| ७६ | सुबोध कथा | मीरा जाधव | 100 |
| ७७ | उपेक्षित बालके | म.ना. जोशी | 100 |
| ७८ | चोरीची माया | बबन खंडगळे | 100 |
| ७९ | गोष्ट राम्पुरीची | बबन खंडगळे | 100 |
| ८० | टीमटीमणारे तारे | स्नेहलता बावळे | 100 |
| ८१ | १११ बोधकथा | हेमंत गोखले | 100 |
| ८२ | सृष्टीशी जडवू नाते | लीलावती भागवत | 100 |
| ८३ | आदर्श गोष्टी | शोभा जोशी | 100 |
| ८४ | अशीही दिवाळी | वर्षा गडकर | 100 |
| ८५ | स्वप्नाचा पाठपुरावा | वर्षा गडकर | 100 |
| ८६ | म्हणीच्या बोधकथा | म.ना. जोशी | 100 |
| ८७ | मजेदार मज्जा | स्नेहलता बावळे | 100 |
| ८८ | व्यंगावर मात | वर्षा गडकर | 100 |
| ८९ | धाडसी आजी | वर्षा गडकर | 100 |
| ९० | आपले पक्षी-सखे सोबती भाग १ | मंगेश कश्यप | 100 |
| ९१ | आपले पक्षी-सखे सोबती भाग २ | मंगेश कश्यप | 100 |
| ९२ | आपले पक्षी-सखे सोबती भाग ३ | मंगेश कश्यप | 100 |
| ९३ | छोट्यांसाठी मोठ्या गोष्टी | वर्षा गडकर | 100 |
| ९४ | सुसंस्कारीत मनोबल | शोभा जोशी | 100 |
| ९५ | मुल नव्हे देवदूतच | नीला कदम | 100 |
| ९६ | वसा स्वावलंबनाचा | शोभा जोशी | 100 |
| ९७ | गुडबाय छोट्या मित्रा आणि इतर गोष्टी | विनया साठे | 100 |
| ९८ | एक झाड लावू मित्रा | अनंत भावे | 100 |
| ९९ | गोष्टीरूप चाणक्य | राजेंद्र खरे | 150 |
| १०० | माणुसकीचा श्वास | नीला कदम | 100 |
| १०१ | पोषक गोष्टी भाग १ | शोभा जोशी | 100 |
| १०२ | पोषक गोष्टी भाग २ | शोभा जोशी | 100 |
| १०३ | विचार यशाचाच | वर्षा गडकर | 100 |
| १०४ | खरी कमाई | शोभा जोशी | 100 |
| १०५ | नातं | वर्षा गडकर | 100 |
| १०६ | बाल रक्षक कायद्याचे | अविनाश भोंडवे | 100 |

**वरील पुस्तके मागविण्यासाठी समोरील नंबरवर संपर्क करा - मो. ९०११२०१४१४/९८२२५२५४४४**

# क्रिकेटमध्ये नवे नियम, ३४ षटकांनंतर १ चेंडू, ५ बॅकअप प्लेयर




मुंबइ : मुंबई: आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेनं प्लेईंग-११ कंडिशन्समध्ये बदल केले आहेत. सुधारित नियमांची अंमलबजावणी कसोटी क्रिकेटमध्ये जूनपासून, तर मर्यादित षटकांच्या सामन्यांमध्ये जुलैपासून होईल. तशा सूचना आयसीसीनं सदस्य देशांना दिल्या आहेत. प्लेईंग-११ च्या परिस्थितीत सगळ्यात मोठे बदल आंतरराष्ट्रीय एकदिवसीय सामन्यांमध्ये होणार आहेत.

सध्याच्या घडीला एकदिवसीय आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये दोन्ही बाजूंनी दोन नव्या चेंडूंचा वापर होतो. पण आता नव्या नियमांनुसार, एका डावात सुरुवातीची ३४ षटकं दोन्ही चेंडूंचा वापर होईल. त्यानंतर ३५ व्या षटकापासू एक चेंडू डाव संपेपर्यंत दोन्ही बाजूनं वापरला जाईल. ३४ वं षटक संपल्यानंतर आणि ३५ वं षटक सुरु होण्यापूर्वी क्षेत्ररक्षण करणारा संघ दोनपैकी एका चेंडूची निवड करेल. पाऊस किंवा अन्य कारणांमुळे सामन्यात व्यत्यय आल्यानं २५ किंवा त्यापेक्षा कमी षटकांचा खेळ झाल्यास एकाच चेंडूचा वापर केला जाईल. जो चेंडू ३४ व्या षटकापर्यंत वापरला जाणार नाही, तो बॅकअप म्हणून ठेवला जाईल.

सीमारेषेवरील झेल आणि डीआरएसच्या नियमांमध्ये थोडे बदल करण्यात आले आहेत. पण त्यांची माहिती नंतर दिली जाईल.

नियमांमध्ये करण्यात आलेले बदल एका कार्यकारी गटाकडे पाठवण्यात येतील, असं सुरुवातीला सांगण्यात आलं होतं. पण आता हाती आलेल्या माहितीनुसार, आयसीसीच्या मुख्य कार्यकारी समितीनं बदलांना मंजुरी दिलेली आहे. लवकरच एक कार्यकारी गट स्थापन केला जाईल. १९ वर्षांखालील विश्वचषक टी-२० स्पर्धा, ५० षटकांचे सामने हायब्रिड स्वरुपात खेळवायचे की नाही, याचा निर्णय हा गट घेईल. सिंगापूरमध्ये १७ ते २० जुलै दरम्यान होणाऱ्या वार्षिक संमेलनापूर्वी कार्यकारी गट स्थापन होईल, अशी आशा आहे.

साप्ताहिक शब्दरुतू - हे पत्र मालक, प्रकाशक सुमती साईनाथ लांडे यांना मुद्रक विजय दत्तात्रय नगरकर यांनी आदित्य प्रिंटर्स, कामगार सदन, क्रॉस मेनरोड, श्रीरामपूर-४१३७०९, जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून शब्दालय प्रकाशन, पोस्ट बॉक्स नं.९०, वार्ड नं.७, आयडीया टॉवरजवळ, श्रीरामपूर ४१३७०९, जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक- सुमती साईनाथ लांडे
Total Code - SR.NO./MAG/11/2021